## स्वप्न उरातले

इथे कोवळ्या रातीला, स्वप्ने घेऊन उद्याची
वाट चालताना नसे, भिती गाढ काळोखाची

असो भयाण काळोख, असो अनोळखी वाट
तिथे दूर माझ्यासाठी, असे सानुली पहाट

वर रात रातभर, जसे तारेही फिरती
खाली पायाला भिंगरी, खाच-खळगे नी माती

कधी सापडते वाट, कधी वाट हरवते
काही पाहतो म्हणता, सारे दिसेनासे होते

ठेचाळतो अध्ये-मध्ये, पाय चोळामोळा होई
तरी उद्याचे सपान, मला पुढे पुढे नेई

अशी रात 'ही' सरेल, झुंजूमुंजूही होईल
स्वप्न उरातले माझ्या, क्षितीजाशी उमलेल


**- नरेंद्र प्रभू**

http://prabhunarendra.blogspot.com/
http://shabdshabd.blogspot.com/